# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१९/०६/२०१९
## दि.१८/०६/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे २५८/१९,भादविक ३४२,३०२,३४,सह अनुसुचित जाती जमाती प्रतिबंधक कायदा कलम ३(१)(२)(५) |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-५८ वर्षे,रा.जिल्हा.नागौर, राज्य राजस्थान |
| **आरोपी** | तीन इसम, सर्व रा.सारसण्डा तहसिल,डेगाना,जिल्हा.नागौर,राज्य राजस्थान (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०५/२०१९ रोजी चौधरी वस्ती, येथील फर्निचर दुकानात खराडी चंदननगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मुलगा रामस्वरूप,वय-२१ वर्षे यास दोन महिन्यापूर्वी यातील नमुद इसम हजारीराम,रा.राजस्थान याने रामस्वरुप यास पप्पु राम,रा.खराडी,पुणे याचेकडे फर्निचर कामासाठी पाठविले होते. खराडी येथे मुलगा रामस्वरूप हा फर्निचरचे काम करीत असताना,त्यास पप्पुराम व त्याचा मित्र जगदीश यांनी संगनमत करून,त्यास कपडे धुणे, भांडी साफ करणे व घरातील साफ-सफाई करणे, स्वयपांक बनविणे इत्यादि कामे करण्यास सांगितली,ती कामे त्याने केल्यानंतर,काही दिवसांनी रामस्वरूप याने सदरची कामे करण्यास नकार दिला असता,त्याकारणावरून पप्पुराम व जगदीश यांनी दि.०५/०५/२०१९ रोजी रामस्वरूप यास नमुद ठिकाणी असलेल्या फर्निचरचे दुकानातील खोली मध्ये डांबुन ठेवले. तसेच त्यास मारहाण केली. मारहाण केल्यानंतर रामस्वरूप यास त्याच अवस्थेत दि.०६/०५/२०१९ रोजी गांवी राजस्थान येथे पाठविले. त्याचेवर जयपूर येथील खाजगी दवाखान्यात व जोधपुर येथे औषधोपचार चालु असताना,रामस्वरूप हा दि.०४/०६/२०१९ रोजी सकाळी ०७/०० वा. मयत झाला आहे. (सदरचा गुन्हा ००/०० ने राजस्थान वरुन दाखल करण्यात आला आहे.) |
| **त.अंमलदार** | सहाय्यक पोलीस आयुक्त, डॉ.शिवाजी पवार, येरवडा विभाग,पुणे शहर |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे १५२/१९,भादविक ३०७,३२३,५०४ |
| **फिर्यादी** | राजेश भोईटे,वय-४० वर्षे, रा.ओरियन्टल पार्क,हडपसर,पुणे |
| **आरोपी** | महेंद्र हरी कुसाळकर,वय-४० वर्षे,धंदा- रिक्षा ड्रायव्हर,रा.मेघासिटी,एसएनडीटी कॉलेज जवळ, पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०६/२०१९ रोजी १२/०० वा. जय भारत हेअर कटिंग सलुन मध्ये पौड फाटा,कर्वेनगर, पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम महेंद्र हरी कुसाळकर हा मेघासिटी या एसआरए प्रकल्पात अंतर्गत बांधलेल्या इमारतीत राहावयास असुन, सदर इमारती मध्ये पाणी वेळेवर येत नसल्याचे कारणावरुन तसेच इमारतीचे कंम्पाऊंडचे काम फिर्यादी यांनी करु नये म्हणुन सदर इसम हा फिर्यादी यांना जीवे मारण्याची धमकी देत असे. नमुद वेळी व ठिकाणी त्याने फिर्यादी यांना शिवीगाळ करुन दुकानात बोलावुन घेऊन,दुकानातील कैची (कातरी) उचलुन,फिर्यादी यांचे छातीवर वार केला. परंतु फिर्यादी यांनी मागे झुकल्याने सदर कैचीचा वार हा फिर्यादीचे डावे यांचे खांदया जवळ छातीचे वरच्या बाजुस व त्यांचे डोक्यावर वार केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. अरुण घोडके ९०११११५६६६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे २६१/१९,भादविक ३९२,३४१,३४ |
| **फिर्यादी** | परेशकुमार कडीया,वय-३५ वर्ष,रा.शुक्रवार पेठ,पुणे |
| **आरोपी** | तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०६/२०१९ रोजी १६/३० वा.ते १८/०० वा.चे दरम्यान सेव्हन लव्हज चौका जवळ, शंकरशेठ रोडवर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे ऑफीस हे त्यांचे राहते ठिकाणीच असुन,ते त्यांचेकडील व्यवसायातील गोळा झालेली रोख रक्कम त्यांचे गाडीच्या डिग्गी मध्ये ठेवुन, त्यांचे राहते घरी असलेल्या शुक्रवार पेठ येथील कार्यालयाकडे गाडीवर जात असताना,यातील नमुद तीन अनोळखी इसमांनी चारचाकी वाहना मध्ये येवुन त्यांची गाडी आडवी लावुन खाली उतरून,फिर्यादी यांना खाली ढकलून देवुन, अन्य एका इसमाने गाडीच्या डिक्कीत ठेवलेली निळ्या रंगाची पिशवी मधील ५ लाख रूपये रोख रक्कमेसह जबरदस्तीने काढुन घेतली. तसेच फिर्यादी यांनी ओरडले तर त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. यु.टी.राठोड ८८०५१६२६९१ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे २६२/१९,भादविक १४१,१४३,१४५,१४७,१४८,१४९,३२४,३२६,५०४, ५०६, महाराष्ट्र पोलीस अधिनियम १३५,३७(१) |
| **फिर्यादी** | विजय गायकवाड,वय-३५ वर्षे,रा.केसनंद फाटा,वाघोली,पुणे |
| **आरोपी** | १.प्रशांत सुखदेव कुटे,वय-३०,रा.बी.डी.कामगार वसाहत,चंदननगर,पुणे २.मयुर हेमराज वाघमारे,वय-२७,रा.शुभम निवास,चंदननगर,पुणे ३.शहारुख चॉंद शेख,वय-२४,रा.बी.डी. कामगार वसाहत,चंदननगर,पुणे ४.हुसेन अब्दुल शेख,वय-२०,रा.बोराटे वस्ती,चंदननगर,पुणे ५.निजामुद्दीन अजमुद्दीन शेख,वय-१९,रा.टाटा गार्डन,वडगाव-शेरी,पुणे (अटक) व इतर १५ ते २० इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०६/२०१९ रोजी २३/३० वा. खराडी बायपास, वाघेश्वर पार्कीग यार्ड,खांदवेनगर,पुणे नगर रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी त्यांचे हातात लाकडी काठ्या व धारधार हत्याराने काहीएक कारण नसताना,फिर्यादी व त्यांचे भाचे तसेच इतर कामगार यांना वाघेश्वर पार्कीग यार्ड,खांदवेनगर येथील ऑफिस मध्ये घुसुन मारहाण करुन,फिर्यादी यांचे ऑफिस व शेजारील ट्रॅव्हल्स कंपनीचे ऑफिसची तोडफोड करुन नुकसान केले आहे. सदर मारहाणी मध्ये फिर्यादीचा डावा व भाच्याचे डावा हातास फ्रॅक्चर झाले असुन,त्याचे डोक्यात मोठी जखम झाली आहे. सदर मारहाणीत फिर्यादी यांचेकडील ५०,०००/- रु किची सोन्याची अंगठी गहाळ झाली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ए.एम.आठरे |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे २०७/१९,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | मंगेश चाहुरे,वय-५७,रा.भांडारकर रोड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०६/२०१९ रोजी १०/५५ वा. फिर्यादीचे राहते घरी पुणे ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात मोबाईलधारक इसमाने फिर्यादी यांची दिशाभुल करून,त्यांचे खात्याचे परिपुर्ण गोपनीय माहिती विचारून,त्यांचे खात्यावरून एकुण ३० हजार रूपये काढुन घेतले आहेत. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. दिपक लगड ९८२३३८२३३३ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे १५३/१९,भादविक ४०६,४२०,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-८६ वर्षे,रा.एरंडवणे,पुणे |
| **आरोपी** | तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०६/२०१९ रोजी सकाळी १०/३० वा.ते १०/ ५० वा.चे दरम्यान फिर्यादी यांचे वरील राहते घरात |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया व त्यांचे घरात घरकाम करणारी मुलगी ही घरात हजर असताना,यातील नमुद इसमांनी म्हशीचा अर्धा किलो चिक देण्याच्या बहाण्याने त्यांचे घरात प्रवेश करुन, फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन,फिर्यादी यांचे जवळील २,०००/- रुपये रोख सुट्टे मागण्याचे बहाण्याने घेवुन जावुन,तसचे फिर्यादी यांचे गळयातील सोन्याची चैन ३० हजार रू किची सदर इसमाने त्यांचे आईला दाखवुन आणतो असा बहाणा करून,सदरचा ऐवज फसवणुक करुन घेवुन गेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. डी.आर.गुप्ता ९८५०८५०३०७ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो स्टे १९९/१९,भादविक ४१९,४२०,३४,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३७ वर्ष,रा.मुंढवा,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक व विविध बॅंकेचे खातेधारक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०४/२०१९ ते आजपावेतो फिर्यादीचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात मोबाईलधारक व विविध बॅंकेचे खातेधारक यांनी फेसबुकव्दारे अर्जदार यांना लग्नाचे आमिष दाखवुन,अर्जदार यांचेसाठी काही गिफ्ट पाठविलेले आहे असे सांगुन, अर्जदार यांचेशी गोड बोलुन त्यांचा विश्वास संपादन करुन,नमुद बॅंक खात्या मध्ये वेळावेळी वेग-वेगळया कारणांसाठी एकुण १०,८०,४००/- रूपये रक्कम भरण्यास भाग पाडून,फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पोलीस निरीक्षक, भोसले ९८२३५२०१०१ |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ४४२/१९,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-२३ वर्ष,रा.येरवडा,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक व विविध बॅंकेचे खातेधारक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २०/०५/२०१९ रोजी ते दिनांक २४/०५/२०१९ रोजीचे दरम्यासन ऑनलाईन माध्यमाव्दारे (अटक नाही) |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात मोबाईलधारक महिलेने फोन करून,तुम्ही नोकरी डॉट कॉम यावर दाखल केलेला रिझुम संदर्भात तुमचे जॉबसाठी सिलेक्शन झाले आहे. त्याचे सिक्युरिटीसाठी काही पैसे तुम्हाला भरावे लागतील असे सांगुन,फिर्यादीस मेल आयडी व एसएमएसव्दारे प्रथम २,५००/- रुपये भरण्यास सांगितले. त्यावेळी फिर्यादी यांनी मला जॉब नको,माझे पैसे परत पाठवा असे सांगितले असता,त्यांनी प्रोसेससाठी एकुण २४,७५९/- रुपये रक्कम पाठविण्यास सांगुन,फिर्यादी यांची ऑनलाईन फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक,(गुन्हे), अजय वाघमारे ९८२३८११६९६ |

९

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे २०८/१९,भादविक ३७९,३४ |
| **फिर्यादी** | चंद्रकात कांबळे,वय-७० वर्षे,रा.डेक्कन-जिमखाना,पुणे |
| **आरोपी** | दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०६/२०१९ रोजी ०९/४५ वा.फिर्यादी यांचे राहते घराचे जवळ,आश्रम सोसायटीचे समोरुन सार्वजनिक रोडने डेक्कन-जिमखाना,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे आश्रम सोसायटीचे समोरुन सार्वजनिक रोडने डेक्कन-जिमखाना,पुणे याठिकाणाहुन पायी चालत राहते घरी येत असताना,यातील नमुद ठिकाणी काळया रंगाचे मोटार सायकलवरुन आलेल्या दोन अनोळखी इसमांनी पाठीमागे येवुन,फिर्यादी यांना बोलण्यात गुंतवुन,त्यांचे उजवे हाताचे बोटातील लुज असलेली सोन्याची अंगठी ८ हजार रू किची नकळत काढुन,गाडी चालविणा-या इसमाने सदरची अंगठी ही खिशात ठेवुन चोरुन घेवुन गेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस फौजदार, एस.ए.मेमाणे ९९२३२२५१५७ |

**१०**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे २५९/१९,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-४४ वर्षे,रा.खालापुर,ता.खालापुर,जि.रायगड |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०६/२०१९ रोजी १३/३० ते १५/०० वा.चे दरम्यान पीएमपीएमएल बस स्टॉप ते तुळजा भवानीनगर,लेन नं.९,खराडी,पुणे चे दरम्यान बस मधुन व त्यानंतर दुचाकीवरुन प्रवास करीत असताना |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया पीएमपीएमएल बस स्टॉप ते तुळजा भवानीनगर,लेन नं.९,खराडी,पुणे चे दरम्यान बस मधुन व त्यानंतर दुचाकीवरुन प्रवास करीत असताना कोणीतरी अज्ञात इसमाने प्रवासा दरम्यान फिर्यादी यांचे पर्स मध्ये ठेवलेले १,७५,०००/- सोन्याचे गंठण व रोख १,०००/- असा एकुण १,७६,०००/- रू किचा ऐवज चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.ना. एस.ए.पठाण ९१५८५८५३८४ |

## दि.१९/०६/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे २५९/१९,भादविक ३९७ |
| **फिर्यादी** | सुमंता सिंघा,वय-३१ वर्षे,रा.हिंजवडी,पुणे |
| **आरोपी** | अनोळखी आठ इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०६/२०१९ रोजी पहाटे ०३/०० वा. चे दरम्यान साधु वासवानी चौक,पुणे स्टेशन ते ससुन रोड, वुडलॅण्ड हॉटेल समोर,डांबरी रोडवर पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे कामावरून सुटुन फुरसुंगीवरून त्यांचे राहते घरी हिंजवडी,पुणे येथे जात असताना,नमुद ठिकाणी रोडवर यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांना अडवुन,त्यांना धारधार शस्त्राचा धाक दाखवुन, ‘ए पैसे निकाल’ असे म्हणुन लाथा-बुक्क्यांनी मारहाण करून,धारधार शस्त्राने फिर्यादी यांचे डावे हातावर वार करून जखमी केले. त्यानंतर त्यांचे पाकीटा मधील रोख ४००/- रूपये जबरी चोरी करून नेले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. संदिप जमदाडे ९८२२०३०७६९ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**